# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

**(स्वायत्त) (ISO: 9001:2015) (ISO/IES : 27001-2013)**

**शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१**

**दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१६५**

Email : secretary@msbte.com Web :www.msbte.org.in


जा.क्र.मरातंशिमं/का-५३/अधिसूचना/२०२१-२२/ ५७९४ दिनांक: ०७ सप्टेंबर, २०२१

## अधिसूचना

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे अखत्यारीत असलेले अल्पमुदतीचे व्यवसायाभिमुक पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरु करणेबाबत.**

**संदर्भः**- महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. मान्यता-२०२१/(प्र.क्र.११/२१)/तांशि-५, दिनांक- ०७.०९.२०२१

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीत नसलेल्या तथापि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील शासन मान्य विविध प्रकारच्या अल्प मुदतीच्या व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांसाठी नविन संस्था सुरु करणे, अस्तित्वात असलेल्या संलग्नित संस्थामंध्ये नविन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेशक्षमतेत बदल करणे, संस्थेच्या नावांत बदल करणे, संस्थेंच्या व्यवस्थापनेत बदल करणे, संस्थेचे स्थानांतरण करणे तसेच अभ्यासक्रम/संस्था बंद करणेसाठी संस्थांकडून प्रस्ताव फक्त online पध्दतीने दि. १५/०९/२०२१ पर्यंत मागविण्यात येत आहेत. सदर प्रस्ताव सादर करताना अर्जदार संस्थांनी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या www.msbte.org.in या संकेत स्थळावरील मान्यता प्रक्रिया पुस्तिके (Approval Process Manual) मधील नमुद अभ्यासक्रमांकरीता विहित नमुन्यात Online प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह Upload करावे. प्रस्ताव Online भरताना Processing fee रु. २५,०००/- विहित मुदतीत Online भरणे आवश्यक आहे. मान्यता प्रक्रिया पुस्तिका मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. विहीत मुदतीनंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ज्या संस्थांनी यापुर्वी सदर प्रक्रियेसाठी Online पद्धतीने अर्ज दाखल केलेले आहे त्या संस्थांनी संस्थेच्या मुखपत्रावर दाखल अर्जावर पुढील कार्यवाही करावी किंवा नाही याबाबतचे विहीत नमुन्यातील संमतीपत्र Online पद्धतीने दि. १५/०९/२०२१ पुर्वी सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदर अर्जाच्या अनुषंगाने यापुर्वी दाखल केलेल्या कागदपत्रांव्यतीरीक्त काही जास्तीची (Additional) कागदपत्रे दाखल करावयाची असल्यास ती Online पद्धतीने upload करावीत.

**प्रस्ताव सादर करणे व त्याअनुषंगिक प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | ट्रस्ट/सोसायटी/कंपनी/संस्था यांचा प्रस्ताव/अर्ज online पध्दतीने आवश्यक ती कागदपत्रे upload करुन submit करणे. | दि. ०८.०९.२०२१ ते १५.०९.२०२१ |
| २ | मुळ कागदपत्रांची तपासणी संबंधित विभागीय कार्यालयाच्या छाननी समितीमार्फत करुन घेणे व पात्र संस्थेतील पायाभूत सुविधांच्या भौतिक पडताळणी तज्ञ समितीद्वारे करणे. | दि. १३.०९.२०२१ ते २५.०९.२०२१ |
| ३ | विभागीय स्तरीय समितीद्वारे भौतिक तज्ञ समितीचे अहवाल पडताळणी व संकलीत करुन मंडळास सादर करणे. | दि. २७.०९.२०२१ ते ३०.०९.२०२१ |
| ४ | राज्यस्तरीय समितीद्वारे विभागीय स्तरीय समितीच्या शिफारशीची पडताळणी करुन अहवाल शासनास सादर करणे. | दि. ०१.१०.२०२१ ते १०.१०.२०२१ |

सूचना:

१. मंडळाने विहित केलेल्या मान्यता प्रक्रिया पुस्तिकेनुसार नविन संस्थांना मान्यता देणे बाबत, तसेच अस्तित्वात असलेल्या संलग्नित संस्था मध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेशक्षमतेत बदल करणे, संस्थेच्या नावात बदल करणे, संस्थेच्या व्यवस्थापनेत बदल करणे, संस्था स्थानांतरण करणे तसेच अभ्यासक्रम/संस्था बंद करणे बाबत कार्यवाही केली जाईल. संस्थेने मान्यता प्रक्रिया पुस्तिके मधील नमूद सुचना काळजीपुर्वक वाचाव्यात व त्यानुसार आवश्यकती माहीती अचुक भरण्याबाबतची कार्यवाही करावी.

२. संस्थानी online पध्दतीने भरलेल्या अर्जाची सही व शिक्का असलेली मुळ(Original) प्रत तसेच त्या अर्जा सोबत upload केलेल्या undertaking ची मुळ(Original) प्रत विभागीय कार्यालयास विहित मुदतीत सादर करावी.

३. संस्था प्रतिनिधीनी छाननी समिती मार्फत विभागीय कार्यालयाकडून प्रस्तावाची तपासणी करुन घ्यावी. अपुर्ण अर्जावर पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

४. कागदपत्रे पडताळणी समिती मार्फत पडताळणीनंतर परीपुर्ण असणाऱ्या प्रस्तावांच्या अनुषंगाने आवश्यक शैक्षणिक सोयी सुविधा तसेच पायाभूत सुविधा संस्थेत उपलब्ध असल्याची तपासणी तज्ञ समिती मार्फत करण्यात येईल.

५. मंडळाच्या अखत्यारीतील शासनमान्य अल्पमुदतीचे अभ्यासक्रम हे कायम विनाअनुदानित तत्वावर असून सदर अभ्यासक्रमांकरीता कोणत्याही प्रकारचे अनुदान शासनामार्फत देय असणार नाही.

६. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टिईडी-२००९/(३३६/०९)/ तांशि-५, दिनांक-१५.०७.२००९ अन्वये मंडळाच्या अखत्यारीतील अल्पमुदतीच्या शासन मान्य (Non-AICTE) पदविका अभ्यासक्रमांना कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांना फी – प्रतिपुर्ती योजना लागू राहणार नाही.

७. कोणत्याही संस्थेने शासन मान्यता व मंडळाची संलग्नता मिळाल्या शिवाय विद्यार्थ्यांचे प्रवेश करुन येत. मान्यता/संलग्नता मिळाल्याखेरीज विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास, त्यास संपूर्णत: संस्था जबाबदार राहील.

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयांची माहिती:-**

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे नाव व पत्ता | विभागांतर्गत येणारे जिल्हे | दूरध्वनी / फॅक्स क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|---|
| १ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, शासकिय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व) मुंबई-४०००५१ | मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग | दूरध्वनी क्र. (०२२) ६२५४२१११ | rbtemumbai@msbte.com |
| २ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे, ४१२-ई, बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६ | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर | दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६९९४/ २५६६०३१९ | rbtepn@msbte.com |
| ३ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर, शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर नागपूर - ४४०००१ | नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा | दूरध्वनी क्र. (०७१२) ६६०३८७५/ ७६/७७/७८ | rbteng@msbte.com |
| ४ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद, शासकिय तंत्रनिकेतन परिसर, स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद-४३१००५ | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, बीड, नाशिक, धूळे, जळगांव, अहमदनगर, नंदूरबार | दूरध्वनी क्र. (०२४०) २३४०८९० / २३३४०२५ | rbteau@msbte.com |

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

# <u>यापुर्वी अर्ज दाखल केलेल्या संस्थानी सादर करावयाचे संमतीपत्राचा नमुना</u>

(सदर संमतीपत्र संस्थेच्या Letter Head वर देण्यात यावे)

विषय:- महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे अखत्यारीत असलेले अल्पमुदतीचे व्यवसायाभिमुक पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरु करणेबाबत....

संदर्भ:-१) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची अधिसूचना दि. २५/०५/२०२१.

२) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची अधिसूचना दि. ०८/०९/२०२१.

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र. १ ला अनुसरुन मी ......................................... पदनाम..........................संस्थेचे नाव......................दि.............................रोजी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांकरीता नविन संस्था सुरु करणे / संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे / प्रवेशक्षमतेत बदल करणे/ संस्थेच्या नावात बदल करणे/ संस्थेच्या व्यवस्थापनेत बदल करणे/ संस्था स्थानांतरण करणे /अभ्यासक्रम/संस्था बंद करणे याकरीता अर्ज सादर केलेला आहे.

आता संदर्भ क्र. २ च्या अधिसुचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे माझ्या वर नमूद केलेल्या अर्जावर महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फ़त पुढील कार्यवाही करण्यात यावी / करण्यात येऊ नये अशी आपणास विनंती करण्यात येत आहे.

**शिक्का**

अर्जदाराचे नाव व सही